# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

<u>घन कचरा व्यवस्थापन खाते जी/उत्तर विभाग</u>

**क्र.जीउ/ १०४९ /स.अभि.(घ.क.व्य.) दि: १९.०६.२०२५**

<u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>
जाहिरात

विषय :- जी/उत्तर विभागातील दादर,माहीम व धारावी या ठिकाणी कचरा गाडीवर घन कचरा उचलण्यासाठी व रस्ते साफ-सफाईकरीता संस्थांची नेमणूक करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार जी/उत्तर विभागातील दादर, माहीम व धारावी या ठिकाणी कचरा गाडीवर घन कचरा उचलण्यासाठी व रस्ते साफ-सफाईकरीता अशासकीय संस्थांचे कामगार नेमणूक करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्याकरीता अशासकीय सामाजिक संस्थेकडून कामगार घेण्याबाबत संस्थेची निवड करण्याकरीता स्थानिक अशासकीय संस्थांची नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था, इ. संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी मोटर लोडींग कामाचा अनुभव असणा-या संस्थांकडूनच अर्ज मागविण्यात येत आहेत.

तसेच अर्जाचा नमुना जी/उत्तर विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) यांच्या कार्यालयात रु.३६३०./- अधिक १८ टक्के जीएसटी असे एकूण रु. ४२८४/- रोख स्वरुपात (ना परतावा) दि. १९.०६.२०२५ ते व दि. २३.०६.२०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ०३.०० (दि. २३.०६.२०२५ रोजी दुपारी ०१.००) यावेळेतच विकत मिळू शकेल. सदर कामाकरीता अनामत रक्कम रु. ६५०००/- (पासस्ठ हजार रु. फक्त) रोख स्वरुपात (परतावा) इतकी राहील. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी जी/उत्तर कार्यालयात घ.क.व्य. विभाग जी/उत्तर,पहिला मजला, रुम नं.३५ येथे संपर्क करावा. संस्थेने जी/उत्तर विभाग कार्यालयात अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख दि. २३.०६.२०२५ (दु.३.०० वाजेपर्यंत) असेल. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/- (१९.०६.२०२५)
**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) जी/उत्तर विभाग**